पुढारी

# देवचंदच्या विद्यार्थ्यांची क्विक हील फाऊंडेशनच्या क्लब ऑफिसरपदी निवड

**निपाणी : पुढारी वृत्तसेवा**

देवचंद कॉलेज, अर्जुननगर आणि क्विक हील फाऊंडेशन, पुणे यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाल्यानंतर महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागातील चार विद्यार्थ्यांची 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली आहे. या चार क्लब ऑफिसर्ससह १६ सायबर वॉरियर्स असे एकूण २० विद्यार्थी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेणार आहेत.

क्लब ऑफिसर म्हणून रुद्र सुतार (प्रेसिडेंट), ज्योती भोंगाळे (सेक्रेटरी), मधुरा पुंडे (कम्युनिटी डायरेक्टर) आणि प्रतीक्षा नाईक (मीडिया डायरेक्टर) यांची निवड करण्यात आली आहे. या उपक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. प्रशांत कुंभार यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.



अर्जुननगर : निवड झालेल्या विद्यार्थ्यांसोबत प्राध्यापक वर्ग.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे ऑफलाइन प्रशिक्षण आणि ओरिएंटेशन पुण्यातील विमाननगर येथील क्विक हील फाऊंडेशनच्या कार्यालयात पार पडले. प्रशिक्षण सत्रादरम्यान अजय शिर्के, गायत्री केसकर-पवार, दीपू सिंग आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेच्या विविध पैलूंबाबत मार्गदर्शन केले. तसेच फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

आजच्या डिजिटल युगात इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत असताना सायबर गुन्ह्यांमध्येही वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर सायबर सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

क्लब ऑफिसर्सच्या नेतृत्वाखाली १६ सायबर वॉरियर्स महाविद्यालय परिसरातील शाळा, महाविद्यालये आणि समाजातील विविध घटकांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करणार आहेत.

'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रमाचे हे चौथे वर्ष असून, मागील तीन वर्षांत देवचंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी विविध पुरस्कार पटकावले आहेत. गेल्या वर्षी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचे सर्वत्र कौतुक झाले होते.

या उपक्रमासाठी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशिषभाई शाह व उपाध्यक्षा डॉ. तृप्ती शाह यांचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आर. एम. साळुंखे आणि संगणकशास्त्र विभागप्रमुख स्वप्नील पोतदार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.